# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक ३१ जुलै, २०१३
## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

**(अ) लक्षवेधी सूचना - (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

**(मंगळवार, दिनांक ३० जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) - (क्रमांक १ ते ३) -**

(१) **डॉ. रणजित पाटील,** श्री. नागो गाणार **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंधारण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर येथील गेल्या एक वर्षापासून सुरु असलेले अंबापूर धरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असणे, नुकत्याच दिनांक १४ जून रोजी झालेल्या पावसामुळे अंबापूर धरणाची मुख्य भिंत फुटून शेतकऱ्यांचे कोट्यावधी रूपयांचे नुकसान होणे, धरणातील पाणी लगतच्या शेतात साचल्याने शेतीतील पिक, रखडून गेले असणे, शेतातील विहीरी खचल्या असणे, शेतीतील अवजारे व पाईप धरणाच्या पाण्याने वाहून गेले असणे, बागायती शेतीची मोठ्या प्रमाणात हानी झाली असणे, शेतात खड्डे पडले असणे, संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर व कंत्राटदारांवर कुठल्याच प्रकारची कार्यवाही झाली नसणे, तसेच, नुकसान भरपाई मिळाली नसणे, यामुळे शेतकऱ्यांच्या मनात शासनाप्रती झालेली तीव्र संतापाचा भावना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

(२) **श्री. अमरसिंह पंडित वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"बीड जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँका, शेडयूल्ड कमर्शियल बँका तसेच आयसीआयसीआय, ॲक्सिस, आयडीबीआय इत्यादि बँकेत जिल्ह्यातील ठेवीदारांच्या ३,७७,८९९ लक्ष रूपयांच्या ठेवी जमा असणे, ठेवीच्या प्रमाणात या बँकानी कर्ज वाटप करण्यास नकार देणे, आयसीआयसीआय बँकेने १७१ कोटी रूपयांच्या ठेवीपोटी ६ कोटी रूपयांचे कर्ज वाटप करणे, ॲक्सिस बँकेने २९ कोटी रूपयांच्या ठेवीपोटी केवळ ४ कोटी रूपयांचे कर्ज वाटप करणे, स्टेट बँक ऑफ हैदराबादने १,१९२ कोटी रूपयांच्या ठेवीपोटी केवळ ७१० कोटी रूपयांचे कर्ज वाटप करणे, जिल्हा मध्यवर्ती बँक आणि महाराष्ट्र ग्रामीण बँक वगळता इतर बँकांनी कर्जाचे ठेवींशी आदर्श प्रमाण (सीडी

रेशो) निर्धारित प्रमाणात न पाळणे, शासनाच्या निकषाप्रमाणे, कर्जदारांना अल्पव्याज दर किंवा शुन्य टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध न करणे, अनेक बँकांनी शासनाकडून सवलतीच्या व्याजदराची रक्कम स्विकारूनही कर्जदार शेतकऱ्यांना व्याजाची सवलत न देणे, खाजगी बँकांना सवलतीच्या दरात पिक कर्ज वाटपाच्या दृष्टीने शासनाने व्याजातील फरक मंजूर करणे, परंतु राज्य शासनान् त्यांच्या वाट्याचा फरक त्या बँकाना मंजूर न करणे, यामुळे जिल्ह्यातील लाखो शेतकरी शेती कर्जापासून वंचित राहणे, यामुळे ऐन दुष्काळी परिस्थितीत शेतकरी त्रस्त होणे, जिल्ह्यातील बँकांनी उद्दिष्टाप्रमाणे व सवलतीच्या व्याजदरात कर्ज वाटप करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येणे, या मागणीकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने या गंभीर विषयाबाबत करावयाची सत्वर कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. विनायक राऊत वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबई विद्यापीठाने केलेल्या करारानुसार महाविद्यालयीन प्रथम वर्षाचे प्रवेश ऑनलाईन नोंदणी करतांना विद्यार्थ्यांनी दिलेल्या व्यक्तीगत माहितीचा वापर संशोधन कार्यासाठी आणि कायदेशीर उपयोगासाठी करण्याबाबतचा करार मान्य केल्याशिवाय पुढे जाता येत नसणे, विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती खाजगी कंपनीला देण्यात येणार असल्याने त्यातून निर्माण होणारे संभाव्य धोके, त्यामुळे विद्यार्थी व पालक वर्गात वाढते व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

(४) **ॲड. आशिष शेलार,** सर्वश्री विनोद तावडे, विजय ऊर्फ भाई गिरकर, चंद्रकांत पाटील **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबई महानगरपालिकेने सन २०१४ ते २०३४ पर्यंतचा नवीन विकास आराखडा बनविण्याची कार्यवाही सुरु असणे,महानगरपालिकेमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या जागा व त्यावर प्रत्यक्षात असलेले बांधकाम कोणत्या प्रकारचे आहे त्याचा सर्व्हे माहे एप्रिल, २०१२ मध्ये पूर्ण करुन त्या जागेचे सामान्य नागरिकांकडून लेखी अर्जान्वये हरकत सूचना मागविणे, गेले ३० ते ४० वर्षे काही रिकाम्या जागांवर महानगरपालिकेने विकास आराखड्यामध्ये वेगवेगळ्या आरक्षण केलेल्या जागांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होऊन हजारो झोपडीधारक सन १९९५ पूर्वीपासून तेथे रहात असूनही त्याना SRA अंतर्गत प्रकल्प करता येत नसणे, या झोपडीधारकांना शासनाने घरे देणे,

बंधनकारक असणे, यास्तव सन २०१४ ते सन २०३४ अशा विकास आराखड्यांचा फेर आढावा घेत असताना पूर्वी वर्षानुवर्षे असलेली वेगवेगळी आरक्षणे, त्यावर झालेली अतिक्रमणे व याबाबत शासनाने ठोस भूमिका घेणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व झोपडपट्टीतील गोरगरीब लोकांना न्याय देण्याची भूमिका."

(५) **श्री.एम.एम.शेख वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"औरंगाबाद सिडको विशेष प्राधिकरणाने २८ खेड्यांतील १५,१८४ हेक्टर जमिनीवर झालर क्षेत्र विकासाच्या नावाखाली तयार केलेला आराखडा, त्यात सातारा व देवळाई येथे ५० टक्केपेक्षा जास्त बाधंकाम होणे, सातारा गावाची लोकसंख्या ४० हजार असून तेथे नविन नगरपालिका विचाराधीत असणे, सिडकोने झालर क्षेत्र जाहिर करताना ग्रीन झोन व डोंगर लगतचा भाग फॉरेस्ट स्लोप झोन टाकल्याने शेतकऱ्यांचे अतिनुकसान होणे, सातारा परिसरात दोन इंजिनिअरिंग कॉलेज, चार डी.एड.-बी.एड.-महाविद्यालये, दहा प्राथमिक शाळा, सहा माध्यमिक शाळा, चार उच्च माध्यमिक विद्यालये, तसेच, कमलनयन बजाज अद्यावत रूग्णालय असणे, एस.आर.पी. प्रशिक्षण केंद्र, वॉटर ॲन्ड लॅन्ड मॅनेजमेंट इन्स्टिटट्यूट वाल्मी (५०० एकर जमीन) असणे, असे असताना, येथे ग्रीन झोन, फोरेस्ट स्लोपी झोन दाखविणे त्यामुळे शेतकऱ्यांत पसरलेले चिंतेचे व संतापाचे वातावरण, याबाबत योग्य चौकशी करून संबंधित शेतकऱ्यांना न्याय देण्याकरिता शासनाने केलेली वा करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.रामदास कदम,** डॉ. दिपक सावंत **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गेल्या ४० ते ५० वर्षांपूर्वी मुंबई शहरात प्रभादेवी येथे वसविण्यात आलेल्या कामगार नगर नं.१ सहकारी गृहनिर्माण सोसायटीची इमारत अत्यंत धोकादायक अवस्थेत असणे, या इमारतींचा पुनर्विकास त्याच ठिकाणी करण्याचा येथील रहिवासी सोसायटीने केलेला प्रस्ताव, या संदर्भात करण्यात आलेल्या सर्व्हे मध्ये तेथील फक्त ८२ कुटुंबांचाच सर्व्हे केला असून ३६८ कुटुंबांचा सर्व्हे केला नसल्याची माहिति माहितीच्या अधिकारात प्राप्त झालेल्या माहितीवरून उघड होणे, परंतु या ठिकाणी डी.पी.रोड. व आर.जी. दाखवून ही वस्ती हलविण्याचे सध्या सुरू असलेले कारस्थान, याबाबत या रहिवाश्यांनी मा.मुख्यमंत्र्यांशी केलेल्या पत्रव्यवहारानुसार दिनांक २०

सप्टेंबर, २०११ रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्र्यांनी दिलेले चौकशीचे आदेश, या आदेशानुसार अद्यापही कोणतीच चौकशी संबंधित विभागाकडून करण्यात आलेली नसणे, त्यातच जे.एम.स्कायलार्फ बिल्डकॉन प्रा.लि. यांनी सर्व्हे नं.४३८ लोअर परेल विभाग, या ठिकाणी गोमातानगर गृहनिर्माण सोसायटी, नेहरूनगर गृहनिर्माण सोसायटी सर्व्हे नं.२६८ व माहिम विभाग एकत्र करून ही योजना राबवित असणे, परंतु नेहरूनगर मधील रहिवाशांचे पुनर्वसन होत नसल्याने तेथील जमिनीवरील आरक्षण प्रभादेवी रोड, येथील कामगार नगर, नं.१ मध्ये दाखविण्यात येणे, त्याचप्रमाणे कामगार नगर नं. १ वस्तीच्या जवळून जाणाऱ्या नाल्याची रूंदी १२० फुटावरून ६० फुटावर करून नेहरूनगरमधील रहिवाशांचे पुनर्वसन करण्यासाठी कामगार नगरमधील रहिवाश्यांना गुंडांच्या सहाय्याने हुसकावून लावण्याचे होत असलेले प्रयत्न, यामुळे परिसरात सध्या भितीचे व दहशतीचे पसरलेले वातावरण, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री. राणा जगजितसिंह पाटील वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.ढोकी, ता.जि.उस्मानाबादची गेल्या ४ वर्षांत अंदाजे ६०० कोटी रूपये वार्षिक उलाढाल झालेली असणे, सन २००९-१० पर्यंत लेखा परीक्षण पूर्ण झाले असून, त्यात बऱ्याच गंभीर बाबी समोर येणे, त्या अनुषंगाने लेखा परीक्षकाकडून विशेष अहवाल अद्याप प्रादेशिक सहसंचालक साखर, नांदेड यांच्याकडे दाखल झालेला नसणे, त्यामुळे अद्याप गैरव्यवहारासंदर्भात कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, तसेच लेखा परीक्षकानी सन २०१० नंतरचे लेखापरीक्षण हे कामगार संपावर असल्यामुळे कागदपत्रे मिळत नाहीत अशी सबब देवून पूर्ण केलेले नसणे, यामुळे सभासदांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **सर्वश्री. वसंतराव खोटरे,** विक्रम काळे, डॉ. सुधीर तांबे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"विदर्भ ज्युनिअर टिचर्स असोसिएशन (विज्युक्टा) च्या वतीने गेल्या वर्ष भरात विविध मागण्यांसाठी चार टप्प्यात केलेली आंदोलने, दिनांक १ जानेवारी १९९६ पासून पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतन श्रेणी लागू करणे, दिनांक १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अंशतः अनुदानित तत्वावर लागलेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागु करणे,

४२ दिवसाची संपकाळातील रजा पूर्वरत खात्यावर जमा करणे या व इतर काही मागण्यांसाठी १२ वी च्या पेपर तपासणीवर टाकलेला बहिष्कार, यासंदर्भात दिनाक १६ फेब्रुवारी, २०१३ रोजी मा.शालेय शिक्षण मंत्री, राज्यमंत्री यांच्या समवेत तसेच दिनांक ७ मार्च, २०१३ रोजी मा.मुख्यमंत्री व मा. उप मुख्यमंत्री यांच्या सोबत झालेल्या चर्चेनंतर पेपर तपासणीवरील बहिष्कार मागे घेणे, दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी मा.शालेय शिक्षणमंत्री महोदयांनी विधानपरिषदेत मागण्यांसंबंधी ३ महिन्याच्या आत निर्णय घेतो असे लेखी निवेदन देऊनही अद्याप या बाबत कोणताही निर्णय न घेणे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने दिनांक २० जुलै, २०१३ रोजी वरील मागण्यांच्या संबंधी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मा.शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन आयोजित करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

**(ब) लक्षवेधी सूचने संदर्भातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे -**

**अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** : "नवीन गोदाम बांधकाम कार्यक्रमांतर्गत जिल्हानिहाय बांधावयाच्या गोदामांच्या अंदाजित क्षमतेबाबतची माहिती" या विषयावरील डॉ.रणजित पाटील व इतर वि.प.स. यांनी नियम १०१ अन्वये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी दिनांक १५ एप्रिल, २०१३ रोजी सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : "मुंबईतील म्हाडाच्या संक्रमण शिबीरात २२०० रहिवाशी हक्काच्या घरांच्या प्रतिक्षेत असल्याबाबत" या विषयावरील श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.आशिष शेलार, श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३८२२५ ला दिनांक २० मार्च, २०१३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या

आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(२) **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** : "मुंबईत राज्य शासनाकडे धान्य ठेवण्यासाठी गोदामे नसल्याबाबत" या विषयावरील श्री.रामदास कदम, डॉ.दिपक सावंत, वि.प.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३८९४५ ला दिनांक १७ एप्रिल, २०१३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(३) **मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** : "सातारा व सांगली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांना कायम स्वरुपी पाणी पुरवठा करण्याबाबत" या विषयावरील श्री.विनोद तावडे, श्री.नितीन गडकरी, श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३००९१ ला दिनांक २४ जुलै, २०१२ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

(१) **मुख्यमंत्री** : "मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा पंचवीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : "दिनांक १ एप्रिल, २०१२ ते ३१ मार्च, २०१३ या कालावधीत शासनाच्या वेगवेगळया विभागांतर्गत संस्था, उपक्रमांनी घेतलेल्या कर्ज, कर्जरोखे व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमी विषयीचे विवरणपत्र", सभागृहासमोर ठेवतील.

(३) **सामाजिक न्याय मंत्री** : **(अ)** "महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादितचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

(ब) "शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्यादितचा सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षांचा वार्षिक अहवाल",सभागृहासमोर ठेवतील.

(४) **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** : (अ) "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

(ब) "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा अलग लेखा परिक्षा अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

(क) "कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक वित्तीय अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

(५) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : "उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २००९-२०१० या वर्षाचा वीसावा वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदने पटलावर ठेवणे.**

**चार : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## - मध्यंतर -

**पाच : शासकीय विधेयके -**

(अ) **सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ यांस संयुक्त समितीच्या अहवालानुसार विधानसभेने संमत केलेल्या सुधारणांना विधानपरिषदेने सहमती देणे.**

(ब) **विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

(१) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २२ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१३

(२) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २३ - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, २०१३

(३) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३

(४) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २९ - महाराष्ट्र देवदासी प्रथा (नाहीशी करणे) (सुधारणा) विधेयक, २०१३

सहा : **म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

**(मंगळवार, दिनांक ३० जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले परंतु पुढे ढकलण्यात आलेले प्रस्ताव) -**

**सर्वश्री विनोद तावडे,** पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"कोरड्या दुष्काळामुळे गतवर्षी शेतकरी अडचणीत आला असताना यावर्षी अतिवृष्टीमुळे वर्धा, गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ व रत्नागिरी इत्यादी जिल्ह्यांसह बऱ्याचश्या जिल्ह्यातील नागरिकांच्या घराचे, शेतीचे व जनावरांचे अपरिमीत नुकसान होणे, एवढेच नव्हे तर बऱ्याच नागरीकांना या आपत्तीमध्ये जीव गमवावा लागणे, या जिल्ह्यांमधील लक्षावधी शेतकऱ्यांची शेती व या शेतीवरील नुकतेच पेरलेले पीक या अतिवृष्टीमुळे वाहून गेल्यामुळे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होणे, शेतकऱ्यांचे न भरुन येणारे नुकसान झाल्यामुळे शासनाने ओला दुष्काळ जाहीर करण्याची आवश्यकता, परंतू शासनाकडून याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही घोषणा न होणे, सलग दुसऱ्यावर्षीच्या गंभीर कोरड्या दुष्काळामुळे कोट्यावधी कोरडवाहू व बागायती शेतकऱ्यांचे अब्जावधी रुपयांचे नुकसान होणे, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत न करता शासनामार्फत केवळ कंत्राटदारास लाभ होईल अशा चारा छावण्या व टँकरसाठी बहुतांश निधी खर्च करण्यात येणे, चारा छावण्या व चाराडेपोमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची बाब सभागृहात मांडल्यानंतर या प्रकरणाची १५ दिवसात सीआयडी चौकशी करण्यात येईल असे आश्वासन सभागृहात देण्यात येणे, परंतू अद्यापपर्यत या प्रकरणी कोणतीही कारवाई

करण्यात न येणे, दुष्काळ निवारणासाठी केलेल्या बहुतांश घोषणांची अंमलबजावणी न होणे, सद्यस्थितीत काही ठिकाणी चांगला पाऊस झाल्यामुळे काही नद्यांमध्ये बरेचसे पाणी आले असले तरी नद्यांमधील प्रदुषणाची पातळी वाढल्यामुळे कृत्रिम दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होणे, शासनाने हा दुष्काळ निवारणासाठी धोरणात्मक निर्णय न घेता तात्पुरती मलमपट्टी केल्याने परत राज्याला दुष्काळाला सामोरे जावे लागल्यास गंभीर संकट निर्माण होण्याची शक्यता असणे, पीककर्ज, बि-बियाणे, कोरडवाहू शेती अभियान इत्यादी योजनांमध्ये असलेल्या त्रुटींमुळे कोट्यावधी शेतकरी अडचणीत येणे, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, विचारात घेण्यात यावी."

**सात : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी) -**

**मंगळवार, दिनांक १६ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमांत दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना - (क्रमांक १ व २) -**

**(१) श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.**

"बीड जिल्हा शासकीय रुग्णालयात आरोग्य सेवा पुरविण्याबाबत" या विषयावरील श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४१०३७ ला दिनांक २ एप्रिल, २०१३ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.**

"बीड येथे स्त्री रुग्णालय सुरु करणेबाबत" या विषयावरील श्री.अमरसिंह पंडित व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३७१३७ ला दिनांक १२ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**बुधवार, दिनांक १७ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमांत दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना - (क्रमांक ३ व ४) -**

**(३) डॉ.निलम गोऱ्हे व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"समाजकल्याण विभागाच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या इंदापूर, बारामती, सासवड, पुणे, कोरेगाव पार्क या पाच वसतिगृहात गृहपाल नसल्याची बाब माहे जून, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, तसेच इंदापूर येथील मुलींच्या वसतिगृहाला गेल्या पाच ते सहा महिन्यापासून गृहपाल तसेच पहारेकरी, सफाई कर्मचारी नसणे, अनेकदा ग्रामीण भागात आजूबाजूला मनुष्यवस्ती नसल्याने व पुण्यापासून साधारण १५० कि.मी. दूर राहणाऱ्या या मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होणे, शहर आणि परिसरात महिला, मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत चालला असतांनाच समाजकल्याण विभागाने

अशा प्रकारे विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत गाफील राहिल्याने विद्यार्थीनींच्या पालकांमध्ये व नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतापाचे वातावरण, याबाबत शासनाने या वसतिगृहांमध्ये आवश्यक तो कर्मचारी वर्ग व अन्य सोयी-सुविधा तातडीने पुरविण्याची आवश्यकता."

(४) **श्री.अमरसिंह पंडित व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील घरेलू कामगारांच्या कल्याणासाठी शासनाने घरेलू कामगारांना जनश्री विमा योजनेचा फायदा देणे, यामुळे कामगारांना विमा संरक्षणासह त्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती मिळणे, शालेय पोषण आहारातील तात्पुरत्या व अल्प मानधनावर काम करणाऱ्या ग्रामीण भागातील कामगार महिलांना विम्याची आवश्यकता असणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी कामगार कल्याण विभागाकडे मागणी करणे, या मागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

**गुरुवार, दिनांक १८ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमांत दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना - (क्रमांक ५ व ६) -**

(५) **ॲड.आशिष शेलार व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील भूविकास बँका डबघाईस जाणे, तसेच बँकेतील निवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन व अन्यलाभ गेल्या ४ वर्षापासून देण्यात आलेले नसणे, त्याचप्रमाणे बँकेतील कार्यरत कर्मचाऱ्यांना मागील १६ महिन्यांपासून वेतन देण्यात आलेले नसल्यामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामाना करावा लागत असणे, या संदर्भात विविध लोकप्रतिनिधींनी आणि भूविकास बँक कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी वेळोवेळी शासनाचे लक्ष वेधूनही या संदर्भात शासनाचा कोणताही निर्णय झालेला नसणे, त्यामुळे सदर विषयाचे गांभीर्य लक्षात घेता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.अमरसिंह पंडित व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"गेवराई (जि.बीड) या तालुक्याच्या ठिकाणी जिल्हा परिषद शाळा, न्यायालय, पंचायत समितीसह आदी कार्यालयांच्या इमारती निजामकालीन असणे, निजामकालीन इमारती धोकादायक व नादुरुस्त असणे, शासकीय इमारतींचे नवीन बांधकाम आणि पुनर्विकास करण्याची मागणी वारंवार करण्यात येणे, न्यायालय इमारत बांधकामास तांत्रिक मान्यता मिळूनही निधी अभावी हे काम रखडणे, पंचायत समिती कार्यालयाची

इमारत बांधकामास बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्वावर मान्यता देण्याची मागणी करणे, विविध इमारत बांधकामाचे प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असणे, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही."

**सोमवार, दिनांक २२ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमांत दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना - (क्रमांक ७ व ८) -**

**(७) श्रीमती शोभाताई फडणवीस व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यामध्ये आजपर्यंत सुमोर ८,२०० बेरोजगार सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यात येणे, परंतु शासकीय स्तरावरील काम या संस्थांना नेमके किती टक्के द्यावे या संदर्भात कोणताही निर्णय घेतला नसल्याने या संस्था कामांच्या प्रतिक्षेत असणे, यासंदर्भात या संस्थेच्या सदस्यांनी राज्य शासनाकडे अनेक वेळा तक्रारी दाखल करुन कोणतीच कार्यवाही केली नसल्याने मुंबई येथील आझाद मैदानात आंदोलन केल्यानंतर दिनांक २ एप्रिल, २०१३ रोजी मा.मुख्यमंत्र्यांच्या दालनात आयोजित केलेली बैठक अचानक रद्द करण्यात येणे, या संस्थांना शासकीय स्तरावरील कामे मिळत नाही पंरतु संस्था स्थापन करण्यासाठी तसेच इतर कामांना हजारो रुपयांचा खर्च या बेरोजगांरांना करावा लागत असल्यामुळे त्यांच्यावर पडत असलेला आर्थिक भूर्दंड, यामुळे सदस्यांमध्ये निर्माण झालेले नैराश्याचे वातावरण, एका युवकाने आत्मदहन करण्याचा माहे जून, २०१३ च्या सुमारास दिलेला इशारा, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही."

**(८) श्री.जयंत पाटील व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यामध्ये सन २००९-१० आणि सन २०१०-११ या वित्तीय वर्षाच्या कालावधीत मातीनाला बांध व इतर जलसंधारणाची कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअतंर्गत करण्यात येणे, सदर कामासाठी सेनगाव, लोणार, मंठा, जिंतूर या व इतर जिल्ह्यातील तालुक्यातून मजूर आणून त्यांच्याकडून कुशल व अकुशल प्रकारची कामे करुन घेण्यात येणे, मजूरांच्या नावाने जॉबकार्ड न बनवून त्यांना कामाची मजूरी देखील न देणे, सदर आदिवासी-भटक्या जमातीतील मजूरांनी वैयक्तिकरीत्या व महाराष्ट्र राज्य लालबावटा शेतमजूर युनियनच्या माध्यमातून शासनयंत्रणेकडे पत्रव्यवहार, आंदोलने, निदर्शने इत्यादी माध्यमातून सतत पाठपुरावा करणे, तसेच १२०० पेक्षा जास्त मजूरांनी औरंगाबाद जिल्हा परिषदेसमोर दिनांक २०

मार्च, २०१२ पासून बेमुदत उपोषण करणे, या प्रकरणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यांची समिती घोषित करणे, या प्रकरणी दिनांक ४ जून, २०१२ रोजी अजिंठा पोलीस ठाणे, येथे एफ.आय.आर दाखल करण्यात येणे, त्यामुळे या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्री.रामनाथ मोते व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"विनाअनुदानित सेवा पेन्शन, ग्रॅच्युईटी वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरली जाणे, वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरली जाणे, वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विनाअनुदानित सेवा वरिष्ठ निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन शासन आदेश निर्गमित करणे, याचा फायदा फक्त माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना मिळणे, प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षक तसेच प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकेतरांना मिळत नसणे, शासनाचा निर्णय सदोष व अन्यायकारक असणे, शासन निर्णयात दुरुस्ती करण्याचे वारंवार आश्वासन देऊनही कार्यवाही न होणे, भेदभाव करणे नैसर्गिक न्याय तत्वाविरुध्द असणे, शिक्षक, शिक्षकेतरांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

**(१०) ॲड.आशिष शेलार व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात शासकीय सेवेत असलेल्या कर्मचारी व अधिकारी यांच्याकडे मोठ्या प्रमाणात बेहिशोबी मालमत्ता असल्याबाबत अनेक तक्रारी महाराष्ट्र राज्य लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे आलेल्या असणे, सदर लाचलुचपत केंद्राकडे मुंबई - २१२, ठाणे - ६, नागपूर - ७७, यवतमाळ - १२३, अमरावती - ८८, बुलढाणा - १८, नाशिक - २२, अकोले - २, व वाशिम येथे ६ असे गुन्हे दाखल झालेले असणे, या सर्व विभागात असलेल्या दोषी व बेहिशोबी मालमत्ता जमविल्याप्रकरणी केलेल्या चौकशीअंती दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कारवाई करणेबाबत तसेच केलेल्या कारवाईचा तपशील व त्यांची नावे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वेबसाईटवर जाहीर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३० जुलै, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.